नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/१०/२०२५ (मंगळवार )**

---

## अल्पवयीन बालीकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— फिर्यादीयांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. ३१६/२०२२ कलम ३५४,३५४(अ),३७६, ३७६(२)(जे), ३७६(२)(एल), ३७६(२)(एफ), ३७६(डि) भादंवि सहकलम ४,८,९के, ९जी, ९एन, १० पोक्सो सहकलम ३ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ या कायद्यांन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, नमूद गुन्ह्याची फिर्यादि हि सावनेर येथील रहिवासी असून गुन्ह्यातील पिडीत अल्पवयीन मुलगी हि तीची भाची आहे. फिर्यादिच्या अल्पवयीन पिडीत भाची वय १७ वर्षे हीचे आई वडिल मरण पावल्याने ती एक वर्षाची असल्यापासून फिर्यादिच्या घरीच राहते व फिर्यादि तीचा सांभाळ करते. फिर्यादिची अल्पवयीन भाची हि मानसीक दृष्ट्या कमजोर असल्याने तीचा अनेक ठिकाणी उपचार करूनहि तीची प्रकृती ठिक होत नसल्याने फिर्यादिचा ओळखीचा असलेला **आरोपी क्रं. १ नामे युवराज धनराज सोनटक्के वय ४० वर्षे रा. पहलेपार सावनेर** हा फिर्यादिच्या घरी येवून यातील पिडीतेला बाहेरची भूत बाधा झाल्याने तीची प्रकृती ठिक होत नसल्याने गुन्ह्यातील **आरोपी क्रं. २ नामे मनोहर मारोतराव कोल्हे वय ५५ वर्षे रा. हेटी, ता. सावनेर जि. नागपूर** हा मांत्रिक त्याच्या ओळखीचा असून तो पिडीतेला पूर्णपणे बरा करून देईल असे सांगून फिर्यादिला आरोपी क्रं. २ कडे घेवून चलण्यास राजी केले व आरोपी क्रं. १ याने फिर्यादि व तीच्या पतीसह यातील पिडीतेला दि. ०३/०५/२०२२ रोजी आरोपी क्रं. २ याचे कडे त्याचे राहते घरी हेटी, ता. सावनेर येथे घेवून गेले असता आरोपी क्रं. २ याने पिडीतेला जिन

लागला असून त्याचा उपाय करण्यासाठी पिडीतेला रात्री त्यांचेकडेच ठेवावे लागेल असे सांगून फिर्यादि व तीच्या पतीला त्यांच्या घरून जाण्यास सांगितले, त्यावरून फिर्यादि व तीचे पती त्यांची अल्पवयीन पिडीत भाचीला आरोपी क्रं. २ याचे घरी विश्वासाने ठेवून स्वतःचे घरी निघून गेले, दुसऱ्या दिवशी फिर्यादिचे पतीने पिडीतेला आरोपी क्रं. २ च्या घरून स्वतःच्या घरी आणले असता फिर्यादिने तिला काय इलाज केला ? याबाबत विचारपूस केली असता पिडीतेने दोन्ही आरोपींनी तीच्या सोबत लैंगिक अत्याचार केल्याचे सांगितले वरून फिर्यादि ने पोलीस स्टेशन सावनेर येथे जावून तक्रार दिल्याने आरोपीतांविरूध्द सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

श्रीमती एस.एस. रासकर, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक — पोलीस स्टेशन सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक २८/१०/२०२५ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायधीश, श्री आर.पी पांडे , विशेष न्यायालय यांनी सदर गुन्ह्यातील **आरोपी क्रं. १ नामे युवराज धनराज सोनटक्के वय ४० वर्षे रा. पहलेपार सावनेर** यास **कलम ३७६(२) भादंवि मध्ये १० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास आणि कलम ३ ब्लॅक मॅजिक ॲक्ट २०१३ मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २,०००/—रू दंड, दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावासाची शिक्षा तसेच आरोपी क्रं. २ नामे मनोहर मारोतराव कोल्हे वय ५५ वर्षे रा. हेटी, ता. सावनेर जि. नागपूर कलम ४ पोक्सो मध्ये १० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास आणि कलम ३** महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ मध्ये **१ वर्ष सश्रम कारावास व २,०००/—रू दंड, दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने **एपीपी श्रीमती आसावरी परसोडकर** यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस पोलीस हवालदार मधुकर आदमने, ब.नं ३७६, पोलीस स्टेशन सावनेर यांनी मदत केली आहे.

## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**(एकूण १२ आरोपीविरूध्द १२ गुन्हे नोंद. एकूण १२,४४० /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

**पोलीस स्टेशन खापा**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी पो.स्टे. खापा येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून १) **मौजा निमतलाई** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे प्रेमचंद बळीराम शेंडे वय ५३ वर्ष रा.कोथुर्णा ता. सावनेर जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **५ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ५०० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा टेकाडी** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे सुखचंद्र रामजी सोमकु वर वय ३६ वर्ष रा. टेकाडी ता. सावनेर जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **३० लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू प्रमाणे **एकूण ३००० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **३) मौजा गुमगाव वस्ती खापा** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे (अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून देशी दारू भिंगरी नं. १ च्या ९० एम.एल. क्षमतेच्या १० बॉटल प्रति बॉटल ४०/— रू. प्रमाणे एकूण **४००/— रू. ची** दारू जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. खापा येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. ३९००/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

**पोलीस स्टेशन उमरेड**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी पो.स्टे. उमरेड येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून १) **मौजा दत्त मंदिर जवळ, ईतवारी पेठ, उमरेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे (अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून एका प्लास्टीक डबकी मधून **८ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ८०० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा जायका**

**रेस्टॉरेंट जवळ** अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे अनिकेत गोविदाजी लोंखडे वय ३० वर्ष रा. लिना ले— आउट, उमरेड** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू कोकण ९९९ च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ४ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **३२०/— रू. ची** दारू जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला.

( अशा प्रकारे पो.स्टे. उमरेड येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. ११२०/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन वेलतूर येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. वेलतूर हद्दीतील मौजा **खेंडम, पवनी रोड** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे विजु दाजिबा कुकडे वय ४२ वर्ष रा. खेंडा ता. कुही** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम. एल. क्षमतेच्या ११ बॉटल देशी दारू संत्रा ९९९ प्रति बॉटल किं. ८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **८८०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन बेला**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन बेला येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. बेला हद्दीतील मौजा **बेला** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे आयूष अरूण जयस्वाल वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ४, बेला, ता. उमरेड जि. नागपूर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ९ बॉटल देशी दारू संत्रा ९९९ प्रति बॉटल किं. ८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **७२०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन काटोल**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन कोटोल येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. काटोल हद्दीतील **मौजा लाडगाव शिवार, काटोल** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे सुरेश श्रावण टेकाम वय ५७ वर्ष रा. लाडगाव, ता. काटोल, जि. नागपुर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल देशी दारू संत्री नं. १, प्रति बॉटल किं.

८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **४००/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन कोंढाळी**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. कोंढाळी हद्दीतील **मौजा खापरी बारोकर** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारी महिला **आरोपी नामे (अबक)** हिचे वर पंचांसह छापा कारवाई करून तीचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या १९ बॉटल देशी दारू संत्री नं. १, प्रति बॉटल किं. ८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **१५२०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन केळवद येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. केळवद हद्दीतील **मौजा केळवद शिवार ताप्ती धाबा** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे पंडीत गणपत बंमनोटे, वय ७५ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ केळवद ता. सावनेर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या १२ बॉटल देशी दारू भिंगरी संत्रा नं. १, प्रति बॉटल किं. ८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **९६०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन देवलापार**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन देवलापार येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. देवलापार हद्दीतील **मौजा बौध्दटोला** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे किशोर लक्ष्मण मडके वय ५० वर्षे, रा. बौध्दटोला ता. रामटेक जि. नागपुर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून २५ लीटर मोहफुलांची गावठी दारू, प्रति लीटर १००/— रू प्रमाणे **एकूण किं. २५००/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन सावनेर येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. सावनेर हद्दीतील **मौजा** यशवंबाबा झोपडपटी सावनेर येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे** विनोद पांडुरंग

नारनवरे वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. ०६, यशवंबाबा झोपडपटी सावनेर याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून ९० एम.एल. क्षमतेच्या ११ बॉटल देशी दारू भिंगरी संत्रा प्रति बॉटल किं. ४०/— रू. प्रमाणे एकूण किं. **४४०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशाप्रकारे एकूण १२ आरोपीविरूध्द १२ गुन्हे नोंद व एकूण १२,४४० /— रू. चा मुद्देमाल जप्त**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २८/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत श्री. अरूण राठोड, पोलीस उप — निरीक्षक, पोलीस स्टेशन केळवद यांनी केळवद बाजार परिसर या ठिकाणी परिसरातील लोकांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

१. **अनोळखी मोबाईल क्रमांकावर आलेले व्हिडीओ कॉल उचलु नका. सायबर गुन्हेगार अश्लिल व्हिडीओ दाखवुन रेकॉर्डीग करून तुम्हाला ब्लॅकमेल करतात.**

२. **Wedding Invitation card .apk, PM kisan .apk, ADHAR CARD Update . apk या प्रकारचे ईतर apk फाईल्स वर क्लिक करू नये तसेच शेयर करू नये आपला मोबाईल हॅक होवु शकतो.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी [www.cybercrime.gov.in](http://www.cybercrime.gov.in) या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930 , 1945 यावर तक्रार नोंदवा.**




## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६०८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी

आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे २८ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २८ आरोपी अशा एकुण ५६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २२ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६०८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने